सेवा • संस्कार • समरसता

# लोक उत्कर्ष समिती



## जनसेवा हीच ईश्वरसेवा

**लोकराजा राजर्षि शाहू महाराज जयंती निमित्त**
**लोक उत्कर्ष समितीच्या कार्यकर्त्यांकडून विनम्र अभिवादन**



# मनोगत

लोक उत्कर्ष समिती या ट्रस्टचे काम १९८१ पासून अव्याहतपणे सुरू आहे. गेली जवळजवळ ४० वर्षे अनेक छोटे-मोठे समाजोपयोगी उपक्रम या ट्रस्टमार्फत केले जातात.

यावर्षी प्रथमच एका अहवालाद्वारे ट्रस्टमार्फत केल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सर्वांना देण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे हा अहवाल आता प्रसिद्ध करीत आहोत.

पहिले कार्यालय कोल्हापुरातील तस्ते गल्लीमध्ये एका फ्लॅटच्या स्वरूपात सुरू झाले. याकरिता श्री. टी. जी. राव यांनी अथक परिश्रम केले.

२०२३ मध्ये बऱ्याच वर्षानंतर ट्रस्ट साठी एक नवीन जागा घेऊन सुसज्ज कार्यालय बांधण्याचे ट्रस्टने नक्की केले. याकरिता निधी संकलन अभियान करण्यात आले आणि कोल्हापुरात ५००० स्केअर फुटांची एक प्रशस्त जागा खरेदी करण्यात आली. या पुढील वर्ष-दोन वर्षात त्या ठिकाणी एक सुसज्ज कार्यालय बांधण्याचे नक्की केले आहे. या कार्यालयातून मुख्यतः शैक्षणिक आणि वैद्यकीय समाजोपयोगी उपक्रम सुरू ठेवावेत आणि वाढवावेत असा आपला संकल्प आहे.

लोक उत्कर्ष समिती ट्रस्टतर्फे व्याख्यानमाला, रक्तदान शिबिरे, श्रमसंस्कार शिबिरे, रुग्णोपयोगी साहित्य देण्याची व्यवस्था, झोपडपट्ट्यांमधून संस्कारवर्ग अशा प्रकारचे उपक्रम नेहमी केले जातात.

आता यापुढील टप्प्यामध्ये आठ हजार चौरस फूट बांधकामाचे, तीन मजली कार्यालय उभारण्याचे आपले उद्दिष्ट आहे. २०२५ ला हे नवीन कार्यालय पूर्णत्वास गेलेले पाहण्याचा आनंद आपल्या सर्वांना मिळणार आहे. आपल्या सर्व हितचिंतकांच्या यथोचित योगदानातून आपण हा प्रकल्प लवकरच पूर्ण करू, हा विश्वास आहे. बांधकाम, त्यापुढील देखभाल व इतर खर्च यासाठी आपल्याला फार मोठा आर्थिक निधी उभा करावा लागणार आहे. त्यासाठीच निधी संकलन अभियानाची सुरुवात आपण केली आहे. हा निधी हितचिंतकांच्या योगदानातून उभा राहणार असल्याने, आपल्याकडून जास्तीत जास्त सहकार्याची अपेक्षा आहे. आयकर नियम ८०-जी अंतर्गत सवलतीस लोक उत्कर्ष समिती पात्र आहे.

आपल्या सर्वांच्या भरीव योगदानातून हा प्रकल्प लवकरच पूर्ण करूया.

अध्यक्ष








# रक्तदान शिबिर

कोल्हापूर शहरात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने गेली काही वर्षे आपण रक्तदान शिबिर घेऊन रक्त संकलन कार्यक्रम करीत असतो. यावर्षी त्यात बदल करून रक्तदात्यांना सोईचे होण्यासाठी रक्तदान शिबिरे शहरात विविध ठिकाणी घेण्याची योजना ठरली. यासाठी सुमारे दीड महिना नियोजनबद्ध प्रयत्न करून पाच ठिकाणी रक्तदान शिबिरे झाली.

रक्तदान शिबिरांसाठी खालील पाच ब्लड बँकांचे सहकार्य लाभले.
राजर्षी शाहू ब्लड बँक, वैभवलक्ष्मी ब्लड बँक, महालक्ष्मी ब्लड बँक, संजीवनी ब्लड बँक, सी. पी. आर. ब्लड बँक.

सर्व ठिकाणी दीप प्रज्वलन, भारतमाता पूजन, अखंड भारत संकल्प दिनाची माहिती देणे अशा पद्धतीने सुरवात झाली. अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी भेटी दिल्या. शहरातील नागरिक, सार्वजनिक मंडळे, मित्रमंडळे, तालमी व सामाजिक संस्थांचा सहभाग होता. अनेक ठिकाणी महिलांचाही सहभाग होता.

विशेष म्हणजे रक्तदान शिबिरापूर्वी कै. धनंजय पाडळकर यांनी 'ब्लड बँक टूर' असा अभिनव उपक्रम आयोजित केला होता. त्यात १० कार्यकर्ते सहभागी झाले होते. या उपक्रमात रक्त संकलन करण्यापासून रक्त संक्रमित करण्यापर्यंत होणारा रक्ताचा प्रवास, रक्तावर प्रक्रिया, त्यासाठी लागणारी उपकरणे, अशी माहिती देण्यात आली. सर्वांचा सकारात्मक परिणाम होऊन १८० रक्तदात्यांकडून रक्त संकलित झाले.

१४ ऑगस्ट अखंड भारत संकल्प दिनानिमित्त कोल्हापूर शहरात ५ ठिकाणी रक्तदान शिबिरे झाली. १. तुळजाभवानी मंदिर, राधानगरी रोड, (संख्या २८) प्रायव्हेट हायस्कूल, खासबाग (संख्या ३१) महाडिक वसाहत, (संख्या २९) आर. के. नगर, (संख्या ४५) मंगेश्वर मंदिर, उचगांव, (संख्या ४७) अशा एकूण १८० रक्त पिशव्या जमा झाल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या त्या त्या भागातील स्वयंसेवकांनी या शिबिरांचे आयोजन केले व स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदान शिबिसाठी केलेल्या प्रयत्नातील अनुभवांचे कथन करण्याचा कार्यक्रम १७ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी खरे मंगल कार्यालयात करण्यात आला. या अनुभव कथन कार्यक्रमामुळे पुढील काळात अशा प्रकारचे विविध समाजोपयोगी कार्यक्रम करण्यास चांगला उपयोग होईल.

# उद्योजक मिलन





लोक उत्कर्ष समितीच्या वतीने कोल्हापूरमधील उद्योजकांसाठी अनेक उपक्रम केले जातात. त्यातील एक व्याख्यान आयोजित केले होते. समाजसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हे व्याख्यान संपन्न झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, उद्योजक मिलन शाखा, कोल्हापूर. कोल्हापूर इंजिनीअरिंग असोसिएशन, शिरोली मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशन (स्मॅक), गोकुळ शिरगांव मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशन (गोशिमा), मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल - हातकणंगले (MAKH) या संस्था सहभागी झाल्या होत्या.

**"उद्योजकांचे भारतीयत्व आणि भारतीय उद्योगासाठीचा सुवर्णकाळ"** या विषयावर - **मा. श्री. सुधीर मुतालिक,** सुप्रसिद्ध उद्योजक आणि सी आय आय महाराष्ट्रचे माजी चेअरमन - यांनी व्याख्यान दिले.



## डावी विचारसरणी विध्वंसक; जग पोखरतेय

**अभिजित जोग : डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमालेस प्रारंभ**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगावर आपले वर्चस्व असले पाहिजे, या महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या काही शक्ती आज कार्यरत आहेत. त्यांना देव, देश, धर्माचे काहीच देणे-घेणे नाही. डावी विचारसरणी विध्वंसक असून, ती जगाला पोखरू पाहत आहे. त्यांना समाजामध्ये तेढ निर्माण करून कोऱ्या पाटीवर नाव कोरायचे आहे, असे प्रतिपादन लेखक अभिजित जोग यांनी केले.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथे बुधवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमालेत 'असत्यमेव जयते, जगाला पोखरणारी डावी वाळवी' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. जोग म्हणाले, जगावर वैचारिक आणि राजकीय वर्चस्व असलेच पाहिजे, या विचाराने झपाटलेले वामपंथी या चारही निरंकुशतावादी शक्ती आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी सतत योजना राबवत असतात. कार्ल मार्क्स हा हिटलर इतकाच वंशवादी होता. द्वेष हा कम्युनिझमचा पाया आहे. हेच पालक आपल्या मुलांना शिकवितात. त्यामुळे टोकाची विकृती मुलांमध्ये भिनते. विध्वंसक लोक जोपर्यंत नष्ट होत नाहीत, तोपर्यंत येथील संस्कृतीला बळ मिळणार नाही, असेही जोग यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक कार्यवाह उदय सांगवडेकर यांनी केले.

**कोल्हापूर : डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमालेत बोलताना अभिजित जोग. (छाया : पप्पू अत्तार)**

# डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमाला

लोक उत्कर्ष समिती व हिंदू व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने **पू. डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमाला** १९९६ पासून आयोजित करण्यात येत आहे. वर्षप्रतिपदा (गुढी पाडवा) या दिवशी पू. डॉक्टरांचा जन्मदिन असतो. त्यानंतरचे तीन दिवस ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यावर्षी सदर व्याख्यानमाला दि. १०, ११ व १२ एप्रिल २०२४ या तीन दिवशी राजर्षी शाहू स्मारक भवन येथे उत्साहात संपन्न झाली.


पहिले पुष्प : दि. १० एप्रिल रोजी **श्री. अभिजीत जोग** यांनी **डावी वाळवी** या विषयावर विचार मांडले.

दुसरे पुष्पः दि. ११ एप्रिल रोजी **श्री. योगेश सोमण** यांनी **क्रांतीकारक सावरकर** या विषयावर प्रेरणादायी विचार मांडले.

तिसरे पुष्प : दि १२ एप्रिल रोजी **सौ. मैत्रेयी शिरोळकर** यांनी **मातृशक्ती जिजाऊ** हा विषय सादर केला. सर्व व्याख्यानांना श्रोत्यांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.

या व्याख्यानमालेत यापूर्वी स्व. प्रमोद महाजन, स्व. मुझफ्फर हुसेन, श्री. प्रकाश जावडेकर, स्व. मनोहर पर्रिकर, श्री. चंद्रकांतदादा पाटील, स्व. भालचंद्र कुलकर्णी, डॉ. शरदराव कुंटे, श्री. विनय सहस्त्रबुद्धे, श्री. संबित पात्रा, ब्रिगेडियर हेमंत महाजन, कॅप्टन स्मिता गायकवाड, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, श्री. सुशील पंडित, श्री. पांडुरंग बलकवडे, श्री. सुनिल देवधर, अ‍ॅड. मोनिका अरोरा, श्री. भाऊ तोरसेकर, श्री. राजदत्त, श्री. डॉ. अशोक मोडक, ह. भ. प. शिरीष मोरे, श्री. आशुतोष भटनागर असे अनेक मान्यवर वक्ते येवून गेले आहेत.



Reg. No. F - 1984-KOP

# लोक उत्कर्ष समिती

**२४१८, बी, रामकृष्ण अपार्टमेंट, तस्ते गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६ ०१२**
e-mail : lokutkarshasamiti@gmail.com Mobile : 94225 82314

| CSR Number | 80-G Number |
| --- | --- |
| **CSR00069394** | **AABTL3315JF20231** |

**विद्यानंद शंकर देवधर**
अध्यक्ष

**भास्कर श्रीनिवास कामत**
उपाध्यक्ष

**संतोष शिवाजीराव गाताडे**
कार्यवाह

**प्रमोद गजानन ढोले**
कोषाध्यक्ष

सदस्य : **दीपक वसंतराव सांगलीकर, संदीप आदिनाथ पाटील**
**उपेंद्र बिंदूराव सांगवडेकर, भगवान सुबराव खाडे, सौ. विद्या सूर्यकिरण वाघ**

## प्रकल्प

### राजाभाऊ भोसले रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्र

या अंतर्गत गरजू रुग्णांना वॉकर, व्हील चेअर, कमोड चेअर, एअर बेड, फोल्डिंग बेड,
ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर इत्यादी साहित्य विनामूल्य दिले जाते.

## रक्तदान शिबिर

### १४ ऑगस्ट - अखंड भारत स्मरण दिन संकल्प

दरवर्षी या दिवशी अखंड भारत करण्याचा संकल्प केला जातो
व या निमित्त कोल्हापूर शहराच्या विविध भागांमध्ये 'रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते.

## व्याख्यानमाला

दरवर्षी गुढीपाडव्यानंतरचे सलग तीन दिवस **प. पू. डॉ. के. ब. हेडगेवार व्याख्यानमाला** आयोजित केली जाते

## महापुरुष अभिवादन

महापुरुषांना त्यांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त अभिवादन आणि त्यांच्या विचारांचे स्मरण केले जाते.

